शिरुर कासार

(217)

पहा :- -१).शासन महसुल व वन विभाग निर्णय क्रं.जमीन१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१.दि.७/३/२००६.
२).महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ ला राजपत्र क्रं.एलएनडी १०८३/१६०९७/प्र.क्र.९/ज-१. दि.११/१०/२००० नुसार केलेली सुधारणा.
३).सचिव,श्री.नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, पाथर्डी जि.अहमदनगर यांचा अर्ज दि.३/२/२००४,२१/३/२००६.
४).शासन,शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे प.क्रं.व्हीएलएस १००२/(९०१/२००२)/ प्रा.शि.- ३. दिनांक १/११/२००२.
५).शिक्षणाधिकारी ( प्रा ) ,जिल्हा परिषद बीड यांचे प.क्रं.प्राशि-२/काशि/२००६/११७५३. दिनांक १६/३/२००६.
६).उपविभागीय अधिकारी बीड यांचे पत्र क्रं.०४/जमाबंदी/काशि/२४०. दिं.१५/३/२००४, २१/३/२००६.
७).नगर रचनाकार बीड यांचे प.क्रं.मुल्यांकन /मौ.झापेवाडी/ता.शिरुर/न.र.बीड/१०४८. दिनांक २२/११/२००५.
८).मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे प.क्रं.२००५/मशाका २/आरईव्ही/प्रक्र ७३. दिनांक :- १८/२/२००६.
९).या कार्यालयाचे पृष्टांकन दिनांक २५/३/२००६.

क्रं.२००४/ मशाका-२/ जमा-१/ ७०.
जिल्हाधिकारी कार्यालय बीड.
दिनांक :- १० /४/२००६.

आदेश -

उपविभागीय अधिकारी बीड यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्रं.४ नुसार श्री.नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पाथर्डी जि.अहमदनगर यांना मानुरकर महाराज इंगलीश स्कूल शिरुर बांधण्यासाठी झापेवाडी ता.शिरुर जि.बीड येथील शासकीय गायरान जमीन स.नं. ५१ मौजे झापेवाडी ता.शिरुर जि.बीड मधून ०हे.१५ आर जमीन यांना श्री.नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पाथर्डी जि.अहमदगनर देणे बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ चे नियम ६ ला संदर्भ क्रं. २ नुसार केलेली वित्तीय अधिकाराची सुधारणानुसार व शासनांच्या संदर्भ क्रं.१ मधील निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी बीड हे रु.९७५०/- ( नयू हजार सातशे पन्नास रुपये ) भोगाधिकार मुल्य असलेली ० हे. १५ आर शासकीय जमीन स.नं.५१ मौजे झापेवाडी ता.शिरुर जि.बीड मधुन मुल्य रहीत श्री.नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पाथर्डी जि.अहमदगनर यांना खालील चतु:सिमा प्रमाणे मानुरकर महाराज इंगलीश स्कूल शिरुर बांधण्यासाठी झापेवाडी ता.शिरुर जि.बीड बांधण्यासाठी खालील अटीवर वर्ग/ हस्तांतरण करण्याचे आदेशीत करित आहे.

चतु:सिमा:-

पुर्वेस:- स.नं.५१ मधील उर्वरीत जमीन. पश्चिमेस:- सदरील संस्थेची क्रिडांगणाची जागा.
दक्षीणेस :-स.नं.५१ मधील उर्वरीत जमीन. उत्तरेस :- स.नं.५१ मधील उर्वरीत जमीन.

अटी -

१. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यांत आले आहे . त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहीजे.त्या जमीनीचे हस्तांतरण,विक्री किंवा लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

Amir-280

(219)

२. उपरोक्त जमीनीची त्या खात्यास आवश्यकता नसेल तेंव्हा ती जमीन महसूल खात्यास ( शासनास ) परत करावी लागेल व त्या जमिनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमानुसार करण्यांत येईल.

३. संबधीत संस्थेस नमुना एक ( नियम ६ पहा ) मधील सनदेतील सर्व अटी लागू राहतील.

जिल्हाधिकारी बीड.

प्रतिलिपी :-१).ना.सचिव,महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई यांना माहीतीस्तव सादर.

२).मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहीतीस्तव सादर.

३).उपविभागीय अधिकारी बीड यांना माहीतीस्तव.

४).तहसीलदार शिरुर यांना देवून कळविण्यांत येते की,तालुका निरीक्षक भुमी अभिलेख पाटोदा यांचे कडून या जमीनीची मोजणी करुन घेवुन मोजणी नकाशा प्राप्त करुन घेवुन जमीनीचा ताबा श्री. नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पाथर्डी जि.अहमदनगर यांना देवुन कब्जे पावती पंचनाम्यासह या कार्यालयास पाठवावी.

५). अधिक्षक भुमी अभिलेख बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

६).नगर रचनाकार बीड यांना माहीतीस्तव.

७).तालुका निरीक्षक भुमी अभिलेख पाटोदा यांना देवून कळविण्यांत येते की, जमीनीची मोजणी करुन मोजणी नकाशाची प्रत तहसीलदार शिरुर यांना व या कार्यालयास सादर करावी.

८). सचिव,श्री. नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पाथर्डी जि.अहमदनगर यांना योग्य कार्यवाहीस्तव.

जिल्हाधिकारी बीड.

सचिव
नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ
पाथर्डी, जि.अ.नगर

ISSUED
19/4/06
DESPATCH CLERK,
COLLECTORATE, B[illegible]

४) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांचे क्र.विजिसकअबी/शाब/जमिन/ ०६-०७ दि.१४.८.२००६.

५) उपविभागीय अधिकारी बीड यांचे प.क्रं.२००६/जमाब /कावि ३७२ दि.२८/९/२००६, दि.१६/११/२००६.

क्रं.२००६/मशाका/२/जमा-१/७०.
जिल्हाधिकारी कार्यालय बीड.
दिनांक:- २२ /११ /२००६.

आ दे श .

उपविभागीय अधिकारी बीड यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्रं.५ नुसार सामाजिक न्याय विभागाकडील प्रस्तावित अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या मुला मुलींसाठी निवासी शाळा संकुल व शासकिय वस्तीगृह बांधण्यासाठी झापेवाडी ता. शिरुर जि.बीड येथील शासकीय गायरान जमीन स.नं. ५१ मौजे झापेवाडी ता. शिरुर जि.बीड मधून ४हे.०० आर जमीन विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांना देणे बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

शासनांच्या संदर्भ क्रं.१ व २ मधील निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी बीड हे रुपये ४,८०,०००/- (रु.चार लक्ष अंशी हजार ) मुल्यांकन असलेली ४ हे. ०० आर शासकीय जमीन स.नं.५१ मौजे झापेवाडी ता. शिरुर जि.बीड मधुन मुल्य रहीत विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांना खालील चतु:सिमा प्रमाणे शिरुर येथे सामाजिक न्याय विभागाकडील प्रस्तावित अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या मुला मुलींसाठी निवासी शाळा संकुल व शासकिय वस्तीगृह बांधण्यासाठी खालील अटीवर सदरील जमीनीचा आगावू ताबा देण्याचे आदेशीत करित आहे.

चतु:सिमा:-

पुर्वेस :- सर्वे नंबर १२८ व १२९ पश्चिमेस:- उर्वरित सर्वे नंबर ५१ मधील जमीन.
दक्षीणेस:- उर्वरित सर्वे नंबर ५१ मधील जमीन. उत्तरेस :-उर्वरित सर्वे नंबर ५१ मधील जमीन.

अटी .

१. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यांत आले आहे . त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहीजे.त्या जमीनीचे हस्तांतरण,विक्री किंवा लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

२. उपरोक्त जमीनीची त्या खात्यास आवश्यकता नसेल तेव्हा ती जमीन महसूल खात्यास ( शासनास ) परत करावी लागेल व त्या जमिनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमानुसार करण्यांत येईल.

३. जमीनीचा आगावू ताबा दिलेल्या दिनांकापासून त्या जमीनीचे संरक्षणाची जबाबदारी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांची राहील.

४. महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ चे नियम ६ मधील तरतुदीनुसार भोगाधिकार मुल्यरहीत व जमीन महसूल मुक्त जमीन देण्यांत आलेली असुन सदरील परिपूर्ण प्रस्ताव वरिष्टांना सादर करण्यांस आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्राची पुर्तता करुन देण्याची जबाबदारी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांचीच राहील.

स्वाक्षरी/-
जिल्हाधिकारी बीड.

(कृपया मागे पहा...)

प्रतिलिपी :-१).मा.सचिव,महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई यांना माहीतीस्तव सादर.

२).मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहीतीस्तव सादर.

३) संचालक, समाज कल्याण संचालनायल, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.

४).उपविभागीय अधिकारी बीड यांना माहीतीस्तव.

५).तहसीलदार शिरुर यांना देवून कळविण्यांत येते की,तालुका निरीक्षक भुमी अभिलेख पाटोदा यांचे कडून या जमीनीची मोजणी करुन घेवुन मोजणी नकाशा प्राप्त करुन घेवुन जमीनीचा ताबा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांना देवुन कब्जे पावती पंचनाम्यासह या कार्यालयास पाठवावी.

६).विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

७).नगर रचनाकार बीड यांना माहीतीस्तव.

८).तालुका निरीक्षक भुमी अभिलेख पाटोदा यांना देवून कळविण्यांत येते की, जमीनीची मोजणी करुन मोजणी नकाशाची प्रत तहसीलदार शिरुर यांना व या कार्यालयास सादर करावी.

जिल्हाधिकारी बीड करिता.

86